# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 14.04.2025** **वार- सोमवार**

---

**डॉ.बाबासाहेबआंबेडकर**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 134वी जयंती आज पुण्यात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येत आहे. पुणे रेल्वे स्थानक परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, विविध संस्था संघटनांच्या प्रतिनिधींनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. यानिमित्त विविध संस्था संघटना, आणि राजकीय पक्षांनी सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचं आयोजन केलं आहे.

राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आपल्या कोथरुड मधील निवासस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

.

सिंबायोसिस संस्थेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय आणि स्मारकातर्फे आज विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. संपूर्ण समाज कायम एकसंध राहायला हवा, ही डॉक्टर बाबासाहेबांची इच्छा होती, तिची पूर्तता करणं हे आपलं सर्वांचं कर्तव्य आहे, असं प्रतिपादन राज्याच्या सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी यावेळी केलं.

विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार आणि जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनीही जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेन्द्र भोसले यांनीही महापालिकेतील डॉ. आंबेडकर अर्धाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मुख्य प्रशासकीय इमारतीमधील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. पिंपरी इथल्या भीमसृष्टी परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यावर एकता कर्मचारी संघटनेच्या वतीने हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्यात आली.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी पुणे रेल्वे स्थानकाजवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

.

महापुरुष अभिवादन कृती समितीतर्फे एकता मिसळ हा अनोखा उपक्रम राबवण्यात आला. या अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या ठिकाणी पाच हजार किलो मिसळ तयार करून नागरिकांना वाटण्यात आली.

संविधान ग्रुपच्या वतीने विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून डॉक्टर आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आलं. बाल-आश्रम आणि वृद्धाश्रमात अन्न धान्य वाटप, शालेय साहित्य वाटप करण्यात आलं. भीमगीत गायन, गुणवंतांचा सत्कार, भीम जलसा असे विविध कार्यक्रमही घेण्यात आले.

महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आज अभिवादन मिरवणूक काढण्यात आली.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या विविध महाविद्यालयांच्या वतीनं ‘‘अर्थतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आलं होतं. डॉक्टर आंबेडकरांनी वयाच्या तिशीत लिहिलेली पुस्तकं आजही कालातीत आहेत; पण त्याचवेळी भारतीय अर्थशास्त्राच्या इतिहासात डॉ. आंबेडकरांच्या

योगदानाची  नोंद नाही, ही शोकांतिका असल्याची खंत, अर्थशास्त्राचे अभ्यासक शंतनू लामधाडे यांनी यावेळी व्यक्त केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती समितीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला सर्वपक्षीय कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यानी डॉक्टर बाबासाहेबांना अभिवादन केलं.

**<u>पुरस्कारवितरण</u>**

मातंग साहित्य परिषदेच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे राष्ट्रीय वाङ्ग्मय पुरस्काराचं वितरण पुण्यात करण्यात आलं. सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते डॉ. श्यामा घोणसे, डॉ.अविनाश सांगोलकर, डॉ.मोहन लोंढे, डॉ. किरण भिंगारदेवे, राजेंद्र घावटे, रमेश हनुमंते, सुभाष खिलारे यांच्यासह 46 लेखकांच्या साहित्यकृतींना साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे राष्ट्रीय वाङ्ग्मय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**<u>श्रीरामसबनीस</u>**

लोकव्यवहारांचा अभ्यासक, संशोधक या भूमिकेतून ज्योतिषशास्त्राकडे पाहण्याचा माझा दृष्टीकोन सकारात्मक आहे, असे उद्गार संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक आणि राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी काल पुण्यात काढले. ज्योतिष परिषदेनं आयोजित केलेल्या कार्यक्रमात अध्यक्षपदावरून ते बोलत होते. या कार्यक्रमात, परिषदेचे संस्थापक सदस्य, ख्यातनाम शास्त्रज्ञ श्रीराम सबनीस यांच्या अमृत महोत्सवानिमित्त त्यांचा मानपत्र प्रदान करून सत्कार करण्यात आला. ज्योतिष परिषद संस्थेचे अध्यक्ष व. दा. भट यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना सबनीस म्हणाले, ज्योतिषशास्त्रामुळे मला लोकसंग्रहाची संधी मिळाली. उद्याविषयीचं कुतूहल हे मानवाचं वेगळेपण आहे; आणि ते जोवर आहे, तोवर ज्योतिष टिकून राहील, असं सबनीस म्हणाले.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 39 अंश तर किमान तापमान 18 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्या तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता असून दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहील असा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**